# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
# अवसरी (खुर्द)
# ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५

# मुलांच्या वसतिगृहात खानावळ व उपहारगृह करिता निविदा दस्तावेज

## डिसेंबर २०१८

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द) येथील मुलांच्या वसतिगृहात खानावळ व उपहारगृह करिता केटरिंग कंत्राटदार निवडीच्या प्रक्रिया करीत आहोत . त्या बाबत अटी , शर्ती व फॉर्म खालील शीर्षकाखाली विभागली आहेत:

१. कायदेशीर अटी

२. खानावळ व उपहारगृह संबंधित अटी

३. खानावळ, उपहारगृह व किचनमध्ये स्वच्छता संबंधित मुद्दे

४. नियमांचे उल्लंघना बाबत दंड

५. मुलांचे वसतिगृह साठी मेनूकार्ड.

६. Proforma for the Technical Bid.

७. तांत्रिक बिडसोबत सादर करावयाची माहिती व कागदपत्रे

८. Proforma for the Commercial Bid

९. उपहारगृहसाठी मेनू दर

दिनांक ०७ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी ठीक ११ :०० वाजता प्री-बिड बैठकी करिता इच्छुक केटरर्स यांनी संस्थेत उपस्थित रहावे . अधिक माहितीसाठी कृपया www.gcoeara.ac.in वेबसाईट पाहावे.

संभाव्य केटरर्सना या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, परंतु ते अनिवार्य नाही . तांत्रिक आणि व्यावसायिक बिड्स सादर करण्यासाठी अंतिम मुदत, या निविदा दस्तऐवजाच्या नंतरच्या भागात नमूद केलेल्या दस्तऐवजांसह २० डिसेंबर २०१८ सायंकाळी ५ :०० वाजेपर्यंत रु . २,०००/- च्या धनादेशासह संस्थेत जमा करावे . सदर धनादेश हा Principal, Government College of Engineering and Research, Avasari (kh) यांच्या नावे जमा कारावा. बिड सादर करण्यासाठी पत्ताः

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय**
**अवसरी (खुर्द),**
**तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे,**
**पिन- ४१२ ४०५**

- तांत्रिक बिड , व्यावसायिक बिड स्वतंत्र सीलबंद लिफाफेमध्ये सादर करणे आवश्यक आहे.
- तांत्रिक बिड, व्यावसायिक बिड दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता कार्यालयात उघडण्यात येतील.
- तांत्रिक बिड पूर्तता करीत असलेल्या व नुन्यतम जेवणाचा दर प्रस्तावित केटरर्सला पुरवठा आदेश देण्यात येईल
- कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया **रद्द** करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृहः अटी व शर्ती

मुलांच्या वसतीगृहातील खानावळीमध्ये संस्थेसाठीचे उपहारगृह देखील चालवावे लागेल. **फक्त जेवणासाठी खानावळ चालविण्याचे कंत्राट दिले जाणार नाही. उपहार गृह व खानावळ दोन्ही एकाच कंत्राटदारास चालवावे लागेल.** स्वतः खानावळ न चालविता ती चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणूक (Sub Contracting) करता येणार नाही, तसे आढळून आल्यास कंत्राट रदद करण्यात येईल.

## १. कायदेशीर अटी

१.१ कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या व उपहारगृहाच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१.२ कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे व उपहारगृहाचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१.३ खानावळ व उपहारगृह चालविण्यासाठी एकूण रु. २,५०,०००/- (रु. दोन लाख पन्नास हजार फक्त) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

१.४ स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर, पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६५००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी पाणी / विज पुरवठा अपरिहार्य कारणामुळे संस्थेमार्फत पुरविण्यात अडचण निर्माण झाल्यास त्या बाबतची व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१.५ शीतपेय / दुग्धजन्य पदार्थ / इत्यादी साठी फ्रिज / फ्रीजरची सुविधा कंत्राटदारांनी स्वतः करावयची आहे.

१.६ खानावळ व उपहारगृह चालकांनी सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक आहे व त्या संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितावर दंड लावणे / करार संपुष्टात आणणे सारखी कार्यवाही करण्यात येईल. तसेच बाल कामगार ठेवता येणार नाही.

१.७ बल्ब, ट्यूब लाइट इत्यादीसारख्या किरकोळ देखभाल ही केटरिंग कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१.८ स्वयंपाकघर उपकरणे, स्वयंपाक गॅस आणि डायनिंग हॉल फर्निचर , सर्व्हिस काऊंटर, स्वयंपाक करणारी भांडी , इत्यादी संस्थेमार्फत पुरविल्या जातील. संस्थेमार्फत पुरविलेल्या सर्व वस्तूंची देखभाल ही कॅटररची जबाबदारी असेल.

१.९ संस्थेमार्फत खानावळ / उपहारगृह चालविण्याचे क रार १ (एक) महिन्याची नोटीस देऊन संपुष्टात आणता येईल तसेच खानावळ / उपहारगृह चालकास करार संपुष्टात येण्यापूर्वीच बाहेर पडायचे असल्यास, संस्थेला ३ (तीन) महिन्याची नोटीस किंवा पुढच्या कंत्राटदारास नेमणे, या पैकी जे आधी असेल ते पाळणे बंधनकारक असेल.

१.१० खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी ककरता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

१.११ वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेणाऱ्या मुलांची अंदाजे संख्या ३०० ते ३५० असेल. उपहारगृहामध्ये संस्थेतील एकूण १७०० विद्यार्थी / अधिकारी / कर्मचारी यापैकी कोणीही येऊ शकेल.

१.१२ खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

१.१३ मेस कामगारांना पुरेशा क्षमतेसह प्रथमोपचार पेटीची अनिवार्य सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे.

१.१४ मॅनेजमेंट किंवा पर्यवेक्षीकाची यादी कॅटरने वसतीगृह कुलमंत्री यांना दिली पाहिजे.

१.१५ केटररने तक्रार व सूचना नोंदव ही ठेवली पाहिजे आणि वसतीगृह कुलमंत्री यांच्याशी सल्लामसलत करून प्राप्त सूचनेनुसार कार्यवाहीकरणे बंधनकारक असेल.

१.१६ टेंडर कॉन्ट्रॅक्टच्या संपूर्ण कालावधी दरम्यान केटरला कोणत्याही कारणास्तव किंमत वाढविण्यात येणार नाही.

## २. खानावळ व उपहारगृह संबंधित अटी

२.१ उपहारगृहसाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ तसेच भांडी यांची सोय कंत्राटदारांनी स्वतः करावयाची आहे.

२.२ केंद्र/राज्य शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार उपहारगृहामध्ये Junk Food (Potato chips / wafers/Kurkure इत्यादी) तसेच तंबाकूजन्य पदार्थ यांची विक्री करण्यास सक्त मनाई आहे. उपहारगृहामध्ये चहा, कॉफी, दुध, इडली, वडा, डोसा, उतप्पा, बटाटावडा, मिसळपाव, वडापाव, भजी, पोहे, उपमा, शिरा, पराठा या वस्तूची विक्री करता येईल.

२.३ दरमहा ५ जेवणाचे खाडे (गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

२.४ विद्यार्थांच्या **परीक्षेच्या** पूर्वतयारी ककालावधीदरम्यान व **परीक्षेच्या** कालावधीमधे तसेच सत्र समाप्तीनंतर **खानावळीच्या** मासिककद्दराची **आकारणी** प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२.५ विद्यार्थ्यां□कडून जेवणााच्या मासिकक दराच्या वसूलीची **पूर्ण** जबाबदारी कक्कत्राटदाराचीच राहील. त्याककरीता कत्राटदाराने नगद विरहित व्यवहाराची (Cashless Transactions) सुविधा उपलब्ध **करुन देणे** आवश्यक राहिल. उपहारगृहामध्ये विक्री केलेल्या पदार्थांची **किमत विक्रीच्यावेळेसच घेण्याची दक्षता कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.**

२.६ उपहारगृह व □खाानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थ्यांच्या चर्चेनुसार बदलता येईल.

२.७ दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मे-नू□कार्ड **प्रमाणे जेवण देणे** आवश्यक आहे. मेनूमध्ये कक्काही **कारणाने** बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

२.८ संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही. (विद्यार्थ्यांचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीने गेस्ट चार्ज आकारुन देणे)

२.९ सर्वसाधारणपणे जेवण **देण्याची** वेळ **सकाळी** ९.०० ते ११.०० व सायं**काळी** ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील. उपहार**गृहा**ची वेळ **सकाळी** ७.०० ते ९.०० व **सकाळी** ११.०० ते सायं**काळी** ६.०० अशी राहील.

२.१० खानावळचालक यांनी अन्नधान्य, किराणा सामानाचे पुरेसे प्रमाण राखून ठेवतील व सर्व कच्च्या मालांची सुरक्षित व स्वच्छ पद्धतीनेसाठवण करण्याची जबाबदारी संबंधिताची असेल.

२.११ प्रत्येक जेवणं नंतर बडीशोप व साखर मिश्रित mouth freshner देणे बंधनकारक असेल.

२.१२ उपवासाच्या दिवशी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय , उपवासाचे अन्न देणे बंधनकारक असेल.

२.१३ प्रत्येक सणाच्या दिवशी (वर्षात सरासरी २० दिवस) जेवणात गोड पदार्थ देणे बंधनकारक राहील.

२.१४ वनस्पती तूप आणि मोनोसोडियम ग्लूटामेट (ऍजिनोमोटो) चा वापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे

२.१५ भरलेल्या सॉल्ट / पेप्पर डिस्पेंसर सर्व वेळी टेबलवर उपलब्ध असले पाहिजेत.

२.१६ तयार केलेले अन्न १२ तासांनंतर वापरू नये. असे निदर्शनास आल्यास ठरविल्याप्रमाणे दंड लागू केले जाईल.

## ३. खानावळ, उपहारगृह व किचनमध्ये स्वच्छता संबंधित मुद्दे

३.१ खा-नावळ व उपहारगृहामध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्नपदार्थांचा दर्जा उत्कृष्ट असावा. सर्व अन्नपदार्थ ताजे, ग्गरम व स्वच्छ असावेत.

३.२. जेवण / खाद्यपदार्थाचा चांगलादर्जा ठेवण्यासाठी खानावळ/ उपहारगृहासाठी आवश्यक उपभोग्य वस्तू व पदार्थ बाबत सविस्तर तपशील खालील तक्त्या प्रमाणे असेल. सदर उपभोग्य वस्तू व्यतिरिक्त इतर ब्रान्ड आढळ्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच सर्व भाज्या ताज्या, आळी व कीटक मुक्त असतील. सर्व भाज्यांचा साठा स्वच्छ व सुरक्षित पद्धतीने करणे बंधनकारक असेल.

३.३ कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ. ची विल्हेवाट स्वतः करणे आवश्यक राहील. कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच कच-यापासून ड्रेनेज चोक झालेस त्याची दुरुस्ती कंत्राटदारांनी करावयाची आहे. मेस परिसर स्वच्छतेची जबाबदारी क्कंत्राटदाराची असेल.

३.४ खानावळीतील कर्मचारी यांच्या स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे. ख्खानावळीतील कर्मचा-यांनी ॲपरॉन, gloves, टोपी इत्यादी आवश्यक गणवेश वापरणे बंधनकारक असेल. तसेच कामगाराची वेळोवेळी वैदकीय तपासणी झालेली असल्याचा पुरावा संस्थेस सादर करावा लागेल.

३.५ खानावळीमध्ये व उपहारगृहामध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

३.६ खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना क्कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ख्खा-नावळ चालकावर राहील.

३.७ भांडी, स्वयंपाकघर उपकरणे , फर्निचर, मेस वॉटर कूलरची स्वच्छता ही कॅटररची जबाबदारी आहे. या बाबतीत सर्वोच्च संभाव्य मानक अपेक्षित आहेत.

३.८ स्वयंपाकघर स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी सर्व शक्य उपाय घेणे आवश्यक आहे. यामध्ये बेसिनवर हात धुण्यासाठी पुरेसा द्रव साबण , हात स्वच्छ करण्यासाठी स्वच्छ टॉवेल, कामगारासाठी सलाड, चपाती इत्यादी हाताने हाताळण्यासाठी कामगारांना handgloves इत्यादीचा समावेश आहे.

३.९ विद्यार्थ्यांच्या वॉश बेसिनवर हात धुणे साठी साबण राखणे ही कॅटररची जबाबदारी आहे.

३.१० मेस कामगारांच्या स्वच्छतागृह / शौचालयात, साबण, टॉवेल इत्यादी तरतुदींसह स्वच्छतेची सर्वोच्च पातळी राखली पाहिजे.

३.११ केटररने नेहमीच डाइनिंग एरियाची स्वच्छता राखली पाहिजे.

३.१२ किचन क्षेत्र, जेवणाचे क्षेत्र आणि स्टोरेज क्षेत्रे येथे कमीतकमी दोन महिन्यांतून एकदा परवानाधारक एजन्सीजमार्फत कीटकनियंत्रण करणे संबधित कंत्राटदाराची जबाबदारी असेल. तसे न केल्यास संस्थेमार्फत कीट नियंत्रण करण्यात येईल व त्याचा खर्च कंत्राटदारा कडून वसूल करण्यात येईल.

३.१३ दुर्गंधी टाळण्यासाठी केटररने मेस डायनिंग , किचन आणि वॉशिंग एरियामध्ये नियमितपणे फ्रेशनर्सचा वापर केला पाहिजे.

**उपभोग्य वस्तूंच्या व पदार्थांच्या ब्रँडची परवानगी बाबत चा तक्ता**

| अनुक्रमांक | उपभोग्य वस्तू व पदार्थ | ब्रँड |
|---|---|---|
| १ | मीठ | टाटा, अन्नपूर्णा, निसर्ग ताजा, आशिर्वाद, निर्मा, सेफोला, कॅप्टन कूक |
| २ | मसाले | एमडीएच मसाला, नॉर, कॅच, एव्हरेस्ट, मदर, निलओंस, एमटीआर, प्रिया, पतंजली, रामदेव, के-प्र. |
| ३ | तेल(सूर्यफूल) refined | संड्रोप, गोदरेज, सेफोला, फॉर्च्यून, जेमिनी, निसर्ग फ्रेश, धारा, हायड्रोजनेटेड (वनस्पती) तेलाचा वापर प्रतिबंधित आहे |
| ४ | लोणचे | मदर्स, प्रिया, टॉप, नीलॉन, एमटीआर, बेडेकर,प्रवीण |
| ५ | अट्टा | आशिर्वाद, पिल्सबरी, अन्नपूर्णा, सम्राट, निसर्ग ताजा, पतंजली, शक्ती, भोग |
| ६ | पापड | लिज्जत, गणेश, श्रीजी, रामदेव, मदर्स |
| ७ | तूप | अमुल, मदर डेयरी, ब्रिटानिया, गिट्स, नेस्ले, एव्हरीडे, डायनॅमिक्स, वाडीलाल, वारना, कात्रज,गोवर्धन |
| ८ | श्रीखंड | अमूल, वारणा,चितळे,कात्रज,गोवर्धन |
| ९ | पनीर | अमूल, मदर डेयरी, वाराना, गोवर्धन |
| १० | कोलम तांदूळ | रॉयल, डोनूर, कोहिनूर, इंडिया गेट |
| ११ | टूर डाळ / मसूर डाळ / उडीद डाळ / चणा दल | टाटा, इंडिया गेट, एमटीआर, मेट्रो (डीमार्ट / बिग बाजार / बिगबास्केटवरील पॅक केलेले साहित्य) |
| **** सर्व नॉन ब्रँडेडपदार्थ मेस कमिटीने ठरविल्याप्रमाणे<br>** सर्व भाज्या ताज्या व कीटक विरहित असेल | | |

## ४. नियमांचे उल्लंघना बाबत दंड

खालील नियमांचे उल्लंघन केल्यावर **केटरर्स** वर दंड आकारला जाईल:

| अनुक्रमांक | नियम उल्लंघन | प्रतितक्रार किमान दंड (रु.) |
|---|---|---|
| १ | काउंटरवरतक्रार नोंदवहीची उपलब्धता नसल्यास | १०००/- |
| २ | a) केस, रस्सी, प्लास्टिक, कपडे, 2 mm पेक्षा जास्त व्यासाचा खडा सारख्या वस्तू अन्न मध्ये आढळल्यास<br>b) आठवड्यातून अशुद्ध भांडीच्या तीन किंवा अधिक तक्रारी<br>c) अन्न वेळे पूर्वी संप ने व पर्यायी व्यवस्था न केल्यास<br>d) परवानगीशिवाय कोणत्याही जेवणांच्या मेनूमध्ये बदल<br>e) श्रमिकांकडून गैरवर्तन /त्यांच्या पोशाख आणि वैयक्तिक स्वच्छता बाबत तक्रार आल्यास.<br>f) कामगारांची योग्य आरोग्य तपासणी न झाल्यास | ५०००/- |
| ३ | काचेच्या तुकडे , नाखून, हार्ड प्लास्टासारख्या तीक्ष्ण वस्तू, अन्न मध्ये आढल्यास | १००००/- |
| ४ | शिजवलेले अन्नात कीटक (आळी) आढळ्यास | २५०००/- |
| ५ | अन्न विषबाधा | किमान रू. 2 लाख किंवा त्याहून अधिक + करार संपुष्टात येईल |

# ५. मुलांचे वसतिगृह साठी मेनूकार्ड २०१८-१९

<table>
<tr><th colspan="5">सकाळ (०९:०० ते ११:००)</th><th colspan="5">संध्याकाळ(०७:०० ते ११:००)</th></tr>
<tr><th>वार</th><th>सुकीभाजी</th><th>पातळ भाजी</th><th>वरण भात</th><th>सलाड</th><th>सुकीभाजी</th><th>पातळभाजी</th><th>गोड</th><th>वरणभात</th><th>सलाड</th></tr>
<tr><td rowspan="4">सोम</td><td rowspan="4">फ्लॉवर</td><td rowspan="4">वाटणा</td><td rowspan="4">मुगवरण + भात</td><td rowspan="4">गाजर/काकडी+ कांदा</td><td rowspan="4">बटाटा + वांगी</td><td>पनीरमसाला</td><td>गुलाबजामून (४ सेमीव्यास, ०४नग)</td><td rowspan="4">दालतडका+ जीराराईस</td><td rowspan="4">कोशिंबीर + कांदा भजी</td></tr>
<tr><td>व्हेज मराठा</td><td>बालूशाही(०२नग)</td></tr>
<tr><td>मिक्स व्हेज</td><td>लापशी</td></tr>
<tr><td>मटारपनीर</td><td>जिलेबी(०४नग</td></tr>
<tr><td>मंगळ</td><td>गवार</td><td>हुलगा</td><td>तूरवरण + भात</td><td>बीट+कांदा</td><td>पालक/पालेभाजी</td><td>छोले</td><td>--------</td><td>सांबर + जीरा राईस</td><td>कांदा+ मोड आलेली मटकी</td></tr>
<tr><td>बुध</td><td>शिमलामिरची</td><td>बटाटा</td><td>मुगवरण + भात</td><td>टोमॅटो+कांदा</td><td>मुग (मोड आलेले)</td><td>शेवगा</td><td>--------</td><td>तूरवरण + जीरा राईस</td><td>काकडी+कांदा</td></tr>
<tr><td rowspan="2">गुरु</td><td rowspan="2">शेपू (कापून+डाळ टाकून)</td><td rowspan="2">राजमा/ वाल</td><td rowspan="2">तूर वरण + भात</td><td rowspan="2">बीट+कांदा</td><td rowspan="2">-----</td><td>पुरी + छोले भाजी</td><td rowspan="2">शेवया खीर / शिरा/ श्रीखंड</td><td rowspan="2">व्हेज पूलाव</td><td rowspan="2">काकडी+पालक भजी</td></tr>
<tr><td>आलूपराठा+ शेंगदाणा/ खोबऱ्याचीओलीचटणी</td></tr>
</table>

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **शुक्र** | कारले/ ऋतूनुसारपालेभाजी(कापून+डाळटाकून) | मटकी (मोड आलेली) | मूग वरण + भात | टोमॅटो+कांदा | मसालाभेंडी | मसूर | -------- | सांबर + जीरा राईस | काकडी+मोड आलेली मटकी |
| **शनी** | सोयाबीन मसाला | कढी | दालतडका+ जीराराईस | बीट+कांदा | चना मसाला /कांद्याची पात (कापून+डाळटाकून) | शेव भाजी | -------- | व्हेजबिर्याणी | लिंबू + काकडी+कांदा |
| **रवी** | वांग्याचे भरीत/ टोमॅटोचीचटणी | छोले भाजी | दालतडका+ जीराराईस | टोमॅटो+कांदा | मेथी (कापून+डाळटाकून) | वरण फळ (लाल रस्सा) | -------- | सांबर+ भात | कांदा+ मोड आलेली मटकी |

**टीप :-**१) गोड पदार्थ चांगल्या दर्जाचे व बंदपॅकींग मधील असावेत.

२) सर्व भाज्या व सलाड ताजे असावे.

३) चपाती गरम व ताजी असावी . चपाती शक्यतो Machine made असावी.

४) लोणचे ( कैरी / लिंबू /मिरची/ मिक्स)सोमवार, बुधवार, शुक्रवार, रविवार.

५) एकपापड(उडीदाचे/ नाचणीचे) सोमवार, बुधवार व शुक्रवार.

६) चटणी ( शेंगदाणा / खोबरे/ जवस / कारळ/लसूण ) मंगळवार, गुरूवार व शनिवार.

७) दररोज सकाळी ताक (१०० मिली) व सायंकाळी दही (घट्ट - ०१ वाटी) .

८) आठवड्यातून ३ वेळा जेवणानंतर (सकाळी किंवा सायंकाळी) एक फळ (केळ / पेरू / चिकू / अंबा / द्राक्षे (१०० gm) किंवा हंगामी फळ) देणे बंधनकारक आहे.

# ६. Proforma for the Technical Bid

Hostels for which the bid is being made:------------------------------------------
Name of the Party:--------------------------------------------------------------------
1. Name(s) of the Proprietor(s)/Partner(s):------------------------------------------
2. Contact Address:--------------------------------------------------------------------
3. Contact Number:--------------------------------------------------------------------
4. E mail Address: --------------------------------------------------------------------
5. Cell Phone: -------------------------------------------------------------------------
6. Major establishment:- 1.-------------------------- 2. ---------------------------
3.---------------------------- 4.---------------------------

___________________________________________________________________________

Signature of the Proprietor(S)/Partner(S) or Authorized Representative

Date: ___________ Name of the Signatory: ______________________

Place: ___________ Designation : ___________________ Stamp:

## ७. तांत्रिक बिडसोबत सादर करावयाची माहिती व कागदपत्रे:

१. खानावळ समाधानकारक चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. किमान १५० व्यक्तींसाठी मेस चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व तसे प्रमाणपत्रात स्पष्ठ नमूद केलेले असावे.

२. खानावळ चालकांकडे वैध नोंदणी प्रमाणपत्र, ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला , अन्न व औषध प्रशासनाचा दाखला बाबतचे कागदपत्रे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.

३. GST नोंदणीचे प्रमाणपत्र, मागील २ वर्षाचे आयकर विवरणपत्र व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

४. Partnership deed (if applicable)

५. निविदा सादर करताना रु. २,०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करून त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

६. इतर कोणतीही संबंधित माहिती.

# ८. Proforma for the Commercial Bid

To,
Principal,
Government College of Engineering and Research,
Awasari (Kh)

Sub : Mess Catering contract for Boys Hostel.

Name of the Party: ______________________________________________
Our quotation for the mess of Hostel is: Rs (in words: __________________) per month per student.

The rates of the contract are detailed below:

a) Catering Charges per month per student (in Rs.)

| Base Price | Total Applicable Taxes | Total Amount per month |
|---|---|---|
| | | |

b) Guest Charges (per meal) (in Rs.)

| Base Price | Total Applicable Taxes | Total Amount per meal |
|---|---|---|
| i) with sweet- | | |
| ii) without sweet- | | |

We have read and agreed to:

1. Terms and conditions pertaining to mess tendering contract
2. Rules pertaining to daily functioning of the mess.
3. Penalties for violation of rules, terms and conditions.

____________________________________________________________

Signature of the Proprietor(S)/Partner(S) or Authorized Representative

Date: ___________ Name of the Signatory: ______________________
Place: ___________ Designation : ____________________ Stamp:

# ९. उपहारगृहसाठी मेनू दर

| अ.क्र. | पदार्थांचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | चहा - १०० ml | |
| २ | कॉफी - १०० ml | |
| ३ | दुध - १०० ml | |
| ४ | इडली (२ नग) + सांबर+चटणी | |
| ५ | इडली (१ नग) + वडा (१ नग) + सांबर | |
| ६ | उडीद वडा (२ नग) + सांबर | |
| ७ | डोसा | |
| ८ | उतप्पा | |
| ९ | बटाटावडा (२ नग) + सॅम्पल | |
| १० | मिसळपाव | |
| ११ | वडापाव (१ नग) | |
| १२ | भजी - १०० gm | |
| १३ | पोहे - १०० gm | |
| १४ | उपमा - १०० gm | |
| १५ | शिरा - १०० gm | |
| १६ | पराठा (१ नग) | |

टीप:- सर्व पदार्थ गरम व ताजे असावेत.

---

Signature of the Proprietor(S)/Partner(S) or Authorized Representative

Date: ____________ Name of the Signatory: ________________________

Place: ____________ Designation : _____________________ Stamp:

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५
दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२, ई मेल - gcoeara@gmail.com, वेबसाईट : www.gcoeara.ac.in

जा.क्र.शाअसंमअ/भांडार/२०१८/ 7117 दिनांक : 07-12-2018

विषय :- मुलांचे वसतीगृह खानावळ PRE-BID MEETING मध्ये उपस्थित करण्यात आलेले मुददे.

महाविद्यालयातील मुलांचे वसतीगृह येथील खानावळीकरीता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येवून निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी शुक्रवार दि. ०७.१२.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यालयामध्ये PRE-BID MEETING मध्ये उपस्थिती करण्यात आलेले मुददे खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | निविदा मधील मुददा क्र. नुसार उपस्थित केलेले मुददे | निविदेची सदय स्थिती | उपस्थित मुददयांच्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|---|
| १ | मुददा ४.१- विद्यार्थी मेसमध्ये विद्यार्थी हजेरीकरीता बायोमेट्रीक सिस्टीम असावी | रजिस्टर नोदवही आहे. | कार्यवाही चालू करण्यात येईल |
| २ | विद्यार्थी मेसमध्ये सीसीटिव्ही बसविण्याची परवानगी मिळावी (नवीन मुददा) | -- | कंत्राटदारांनी सीसीटिव्ही बसविण्यास मान्यता देण्यात येईल. |
| ३ | जीएसटी टक्केवारी संस्थेकडून प्रमाणित करण्यात यावी (नवीन मुददा) | -- | कंत्राटदाराने प्रचलीत नियमानुसार जीएसटीची आकारणी करावी. |
| ४ | उपभोग्य वस्तु अ.क्र. ५, आटयाऐवजी गहू दळुन वापरणेस परवानगी मिळावी | आटा वापरावा | निविदा सुचनेनुसार आटा वापरण्यात यावा |
| ५ | १.१२- जेवण व नाष्टा करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ यांना मेसमध्ये राहण्यास परवानगी मिळावी | परवानगी नाही. | निविदा सुचनेनुसार कार्यवाही करावी |
| ६ | टेंडरची बेसीक प्राईस ठरविण्यात यावी (नवीन मुददा) | - | लागु करता येत नाही |
| ७ | मुददा क्र. २.२- नाष्टयामध्ये सॅण्डवीच, फ्रुट सलाड, कोल्ड कॉफी व आईसक्रीम, फ्रुटज्युस, लिंबु सरबत, कोकम सरबत, सोलकढी इत्यादींचा समावेश करण्यात यावा. | उपहारगृहामध्ये चहा, कॉफी, दुध, इडली, वडा, डोसा, उत्ताप्पा, बटाटावडा, मिसळपाव, वडापाव, भजी, पोहे, उपमा, शिरा, पराठा या वस्तुंची विक्री करता येईल. | सुचविण्यात आलेले खालील पदार्थ उपहारगृहाच्या मेनुमध्ये समाविष्ठ करावेत.<br>१. सॅण्डवीच- काकडी, टोमॅटो व चटणीसह<br>२. फ्रुट सॅलड वीथ कस्टर्ड- १००एमएल<br>३. कोल्ड कॉफी- १००एमएल<br>४. फ्रुट ज्युस- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १००एमएल<br>५. लिंबु सरबत - १००एमएल<br>६. कोकम सरबत- १००एमएल<br>७. सोलकढी- १००एमएल |
| ८ | वसतीगृह खानवळ मेन्यु टिप क्र. ३- चपाती हॅण्डमेड असावी | चपाती शक्यतो मशीनमेड असावी | निविदा सुचनेनुसार कार्यवाही करावी |
| ९ | मुददा क्र. २.७- भाज्या सिजनेबल देण्याची परवानगी मिळावी | मेन्युकार्ड प्रमाणे भाज्या असाव्यात | निविदा सुचनेनुसार कार्यवाही करावी |
| १० | सर्व निविदा धारकांसमोर निविदा उघडण्यात याव्यात (नवीन मुददा) | -- | सर्व निविदा धारकांसमोर निविदा उघडण्यात येतील |
| ११ | मेसला वर्षातुन एकदा पेंट करुन मिळावा. (नवीन मुददा) | -- | याबाबत विचार करण्यात येईल |
| १२ | मुददा क्र. - २.१- उपहारगृहाकरीता भांडी संस्थेने उपलब्ध करुन दयावीत. | उपहारगृहासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ तसेच भांडी यांची सोय कंत्राटदारांनी स्वत करावयाची आहे. | निविदा सुचनेनुसार कार्यवाही करावी |
| १३ | मुददा क्र. -२.५- मेसच्या विद्यार्थ्यांनी चालु माहिन्याचे ॲडव्हान्स पेमेंट दयावे | विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसुलीची पुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. | चालु महिन्याच्या १ ते १० तारखे दरम्यान त्या महिन्याची मासिक दराची आगाऊ वसुली करण्यात यावी. |
| १४ | मुददा क्र. - ९.१, ९.२, ९.३ चहा, कॉफी, दुध- ५० एमएल व १०० एमएल या पध्दतीने देण्यात यावेत | चहा, कॉफी, दुध १०० एमएल | चहा, कॉफी व दूध यांचे अनुक्रमे ५० एमएल व १०० एमएल चे दर नमुद करावेत. |
| १५ | उपभोग्य वस्तु अ.क्र. २- मसाले- प्रवीण व सुहाना हे ब्रॅण्ड समाविष्ठ करावेत. | एमडीएच, नॉर, कॅच, एव्हरेस्ट, मदर, निलॉन्स, एमटीआर, प्रीया, पतंजली, रामदेव, केप्र | मसाले- प्रवीण व सुहाना हे अतिरिक्त ब्रॅण्ड समाविष्ठ करावेत. |
| १६ | उपहारगृहासाठी मेन्यु दर- सदरचे दर सर्व करासहीत दर्शवावे किंवा कसे याबाबत निविदाकारांनी शंका उपस्थित केली | -- | उपहारगृहासाठी मेन्यु दर देताना प्रत्येक पदार्थासमोर Basic price, Total applicable Taxes, Total Amount याप्रमाणे स्वतंत्र स्तंभात दर्शविण्यात यावेत. |

टिप- १) रु. २०००/- डी डी (Non refundable), मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द यांचे नावे तांत्रिक बीड लिफाफामध्ये जमा करावा.

२) तांत्रिकी बीडमधील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास व्यवसाईक बीड लिफाफा उघडला जाणार नाही.

**इच्छुक सर्व निविदाकारांनी वरील सर्व बदलांची नोंद घेवून त्यानुसार निविदा सादर कराव्यात असे सुचित करण्यात येत आहे.**

Govt. College of Engineering and Research ★ Awasari Khurd, Tal. Ambegaon, Dist. (Pune) ★

10/12/2018

PRINCIPAL
Govt. College of Engineering
and Research. Awasari,
Tal. Ambegaon, Dist. Pune.